# BDC LIBRARY

## News Paper Clipping

## A.Y. 2025-26

# देसाई महाविद्यालयातर्फे टोळेवाडी येथे वृक्षारोपण

**पाटण :** येथील बाळासाहेब देसाई महाविद्यालयातील एनएसएस, एनसीसी विभाग, श्री सत्यसाई सेवा संघटना सातारा व रोटरी क्लब पाटण यांच्या संयुक्त विद्यमाने टोळेवाडी येथे वृक्षारोपण कार्यक्रम झाला. महाविद्यालयातील स्वयंसेवक, शिक्षक व स्थानिक ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. विद्यार्थी, स्वयंसेवक व प्राध्यापक यांनी परिसराची स्वच्छता करून विविध प्रकारची दोनशे झाडे लावण्यात आली. कार्यक्रमाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. एस. डी. पवार यांच्या हस्ते झाले. एनएसएस कार्यक्रम अधिकारी डॉ. एल. जी. गणगे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. बजरंग चव्हाण यांनी आभार मानले. यावेळी डॉ. संतोष पाटील, रोटरी क्लबचे अध्यक्ष जगदीश शेंडे, सेक्रेटरी किशोर तुळसणकर, शीतल शिंदे, प्रा. श्रीधर साळुंखे, डॉ. भरत जाधव, प्रा. पी. आर. गायकवाड, तुलसी पवार, जॉय कुट्टो आदींसह प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.